प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

डिसेंबर 4, 2018

**डॉ. शिवाजीराव निलंगेकर अर्बन को-ऑपरेटिव बँक लि., निलंगा, महाराष्ट्र ह्यांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47अ(1)(क) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, डॉ. शिवाजीराव निलंगेकर अर्बन को-ऑपरेटिव बँक लि., निलंगा, महाराष्ट्र ह्यांचेवर रु.1,80,000 (रुपये एक लाख ऐंशी हजार) दंड लागु केला असून, तो दंड, आरबीआयने पुढील बाबतीत दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केले गेल्याने लावण्यात आला आहे.

(अ) केवायसी मार्गदर्शक तत्वांचे पालन न करणे (ब) कोणत्याही सीआयसीचे सभासदत्व न मिळविणे (क) आरबीआयने केलेल्या तपासणी अहवालाचे वेळेवारी समाधानकारक अनुपालन न करणे (ड) ठेवीदार शिक्षण व जाणीव निधी (डीईएएफ) मध्ये निधी हस्तांतरित केल्याचा कागदोपत्री पुरावा सादर न करणे (ई) निरनिराळ्या एक्सबीआरएल अहवालांचे अनियमित सादरीकरण

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे उत्तरही सादर केले नव्हते. ह्या प्रकरणातील सत्य विचारात घेऊन रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने झाल्याचे सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1282**